**पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**
आडगाव, नाशिक-पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
**E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक:- २९/०३/२०१८

## ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाचे अवैध धंद्यांवर छापे

---

नाशिक जिल्हयातील अवैध धंदयांचे समुल उच्चाटन करण्यासाठी ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाची धडक मोहिम सुरू असुन छुप्यारित्या मद्याची अवैध वाहतुक व विक्री करणारे, तसेच मटका व जुगाराचे अवैध धंदे चालविणारे इसमांवर सत्वर कारवाई करणेबाबत जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पिंपळगाव बसवंत व दरी गावातील अवैध दारू धंदे तसेच मनमाड शहरातील जुगार अड्डयावर छापे टाकुन कारवाई केली आहे.

दिनांक २७/०३/२०१८ रोजी मा.पोलीस अधीक्षक सो यांनी आदेशीत केलेप्रमाणे अवैध धंदयांवर कारवाई करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी हे पिंपळगाव बसवंत परिसरात गस्त घालत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे पथकाने सायंकाळचे सुमारास पिंपळगाव ते नाशिक जाणारे सर्व्हीस रोडवरील **हॉटेल भोले पंजाब** येथे अचानक छापा टाकला, सदर ठिकाणी हॉटेलचे पाठीमागील बाजुस पत्राचे शेडमध्ये इसम नामे **१) राजु देवेड मसीह, वय ३७, रा. हॉटेल भोले पंजाब, पिंपळगाव बसवंत, ता.निफाड** हा विनापरवाना बेकायदा देशी - विदेशी मद्याची विक्री करतांना मिळुन आला. सदर हॉटेलची झडती घेतली असता, **एकुण ३४,८३०/- रू. चा देशी विदेशी मद्याचा अवैध साठा जप्त** करण्यात आलेला आहे. वरील छाप्यामध्ये ताब्यात घेतलेला इसमाविरूध्द पिंपळगाव बसवंत पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायाद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक २८/०३/२०१८ रोजी विशेष पथकाने दरी ते मातोरी रोडवरील दरी गावचे शिवारातील राजवाडा परिसरात **इसम नामे २) विकी सुखदेव कु-हाडे, वय ३२, रा. दरी, ता.जि.नाशिक** हा विनापरवाना बेकायदेशीर रित्या देशी दारूची विक्री करतांना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन देशी दारूचा किं.रू. ८,८६६/- चा अवैध मद्यसाठा जप्त केला आहे. सदर इसमाविरूध्द नाशिक तालुका पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हयातील अवैध दारूधंदयांचा नायनाट होणेसाठी ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाने पिंपळगाव बसवंत व दरी गावचे शिवारात छापे टाकुन ०२ इसमांविरूध्द **दारूबंदी कायदयान्वये कारवाई** करून **सुमारे ४३,६९६ रू. चा अवैध मद्यसाठा जप्त** केलेला आहे.

तसेच आज दिनांक २९/०३/२०१८ रोजी विशेष पथकाने मनमाड शहरातील पाकीजा कॉर्नर परिसरात अवैधरित्या सुरू असलेले जुगार अड्डयावर अचानक छापा टाकला. मनमाड शहरातील पाकीजा कॉर्नर परिसरात डायमंड चायनीज कॉर्नरचे पाठीमागील बाजुस पत्राचे शेडमध्ये इसम नामे **१) दिपक उर्फ बप्पी गंगाभाउ त्रिभुवन, वय ३५, रा. राजवाडा, मनमाड, ता.नांदगाव** हा स्वत:चे फायदयासाठी काही लोकांकडुन अंक आकडयांवर पैसे लावुन कल्याण नावाचा मटका जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आला. सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन **मटका जुगाराचे साहित्य साधने, मोबाईल फोन व रोख रूपये असा एकुण ६,३१९/- रू.चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेले इसमास सदर मटक्याचे अवैध धंदयाबाबत विचारपुस करता, त्याने मनमाड शहरातील तेली गल्ली परिसरातील **इसम नामे २) हिरामन सोनवणे** याचे सांगणेवरून सदर अवैध धंदा चालवित असल्याचे सांगितले असुन वरील दोन्ही इसमांविरूध्द **मनमाड शहर पोलीस ठाणेस मुंबई जुगार कायदा कलम १२(अ)** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकातील पोउनि श्री. सुरेश चौधरी व पथकातील कर्मचारी यांनी अवैध धंदयांवर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुल उच्चाटन होणेसाठी आगामी काळात सतत कारवाई सुरू राहणार आहे.